# महाराष्ट्रभरात बळीराजा मरतोय जीवानिशी....
# मुंबईत विरोधक-सत्ताधारी करतायेत आपापली सरशी....

**-महेंद्र गौरीकुमार बैसाणे(भारुकाका) मो./व्हाटस अप नं. ९३२१५५०२८६**

**ई मेल:-info@bharukaka.com**

महाराष्ट्रातील महानगरपालिका-जिल्हा परिषदा आणि पाच राज्यातील विधानसभा निवडणुकांचा आरोप-प्रत्यारोप-चिखलफेक आणि होळी-शिमग्याचा सण खेळून झाल्यावर महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून आता विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये जणू 'रस्सी-खेच'चा नवा  खेळ सुरु आहे असे किळसवाणे चित्र संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला दिसत आहे. पंचायत समित्या, जिल्हा परिषदा-महानगरपालिका आणि पाच राज्यातील बहुतेक विधानसभांमध्ये सर्वच विरोधी पक्षांनी सपाटून मार खाल्ल्यानंतर सत्ताधारी भाजपला कोंडीत पकडण्यासाठी हाच एक काय तो मार्ग आणि मुद्दा विरोधकांच्या हाती राहिलाय. म्हणूनच दोन्ही सभागृहांचे कामकाज बंद पाडून भाजपची जेवढी म्हणून कोंडी करता येईल तेवढी ते करण्याचा जीवतोड प्रयत्न करीत आहेत. त्यात भरीस भर म्हणून शिवसेना सारखा भाजपचा सत्तेतील नाराज भिडू दहीभात्या म्हणून त्यांना येऊन मिळालाय! वास्तविक सत्तेत राहून विरोधकांची जागा बळकावून भाजपला जेरीस आणण्याची शिवसेनेची खेळी बुमरँगसारखी सेनेवर उलटण्याची शक्यता नाकारता येत नाही. उद्या मनसेच्या वाटेने शिवसेनेची वाट लागली तर चाळीस वर्षे समाजकारण-राजकारण करणारी शिवसेना  'कच्चा लिंबू' ठरली तर आश्चर्य वाटायला नको. कारण मोदी आणि भाजपवर टिका करावी की प्रशंसा या गोंधळाचा फायदा घेत भाजपने इंजिनाची चाके लोकसभा, विधानसभा आणि आताच्या महानगरपालिकांमधील दारूण पराभवांच्या गाळात रुतवली. शेतकरी आत्महत्या आणि त्यावरील तातडीचा उपाय म्हणून कर्जमाफी या अत्यंत गंभीर विषयावर शिवसेना एक तर कधी तळ्यात तर कधी मळ्यात तरी करतेय किंवा मग नुसतं राजकरण तरी करतेय असंच काहीसं चित्र दिसतंय. शिवसेनेचे नेते मुख्यमंत्र्यांसोबत दिल्लीला जाऊन आल्यानंतर काय कानमंत्र मिळाला असावा कोणास ठाऊक पण त्यांची देहबोली बदलून गेल्याचे मात्र अर्थसंकल्प सादर होताना सर्वांना बघायला मिळाले. अन्यथा कर्जमाफी मिळत नाही म्हटल्यावर अर्थसंकल्पावर शिवसेनेने ताठर भूमिका घेतली असती आणि बहिष्कार टाकला असता तर सरकारला पळता भुई थोडी झाली असती. पण त्याउलट शिवसेनेने मवाळ भूमिका घेतली. तिकडे सामनामधून सातत्याने मोदी, फडणवीस, अर्थसंकल्प यावर होलसेल मध्ये टिकास्त्र सोडण्याचं काम चालूच आहे...हे सर्व बघता राजीनामे खिशात घेऊन फिरणारे मंत्री आणि शिवसेना नेते जनतेला मूर्ख समजतात कि काय? असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. सेनेची तळ्यात-मळ्यात भूमिका ऊर्फ शंभर टक्के राजकारण असेच चालू राहिले तर मनसेसारखीच गत होऊन येणाऱ्या काळात याची खूप मोठी किंमत सेनेला चुकवावी लागेल. महाराष्ट्रातील तमाम मराठी जनतेला हे खचितच अपेक्षित नाहीये हि सेनेची जमेची बाजू त्यांनी गमावता कामा नये.

मुळात उत्तर प्रदेश निवडणुक जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या भाजपच्या आश्वासनामुळे विरोधकांच्या हातात आयतं कोलीत मिळालंय. असे असले तरी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा एवढा संवेदनशील आणि गंभीर विषय आहे की मागणी कोणाचीही असो सरकारने तात्काळ त्यावर पावलं उचलून दिवसागणिक होणाऱ्या आत्महत्या थांबवण्यासाठी युद्धापातळीची उपाय-योजना करायला हवी होती. परंतु तसं न करता विरोधकांची मागणी कशी अवाजवी आहे यावर सरकार आपली सर्व शक्ती खर्च करीत आहे. शिवाय खूप मोठी आर्थिक तरतूद करावी लागणार या खेरीज कर्जमाफीची मागणी मान्य केली तर ते श्रेय विरोधकांना जाईल अशीही भीती सरकारला वाटते कि काय असा संशय घेण्यास भरपूर जागा आहे. तसेच सरकारकडून अजून एक वक्तव्य आलंय की सरकारचीपण इच्छा आहे कर्जमाफीची परंतु त्याविषयीचा निर्णय योग्य वेळी घेऊ. हे खूपच भयानक आहे! म्हणजे तोवर शेतकरी मरताहेत त्याचं सरकारला काहीच सोयरसुतक नाही कि काय? बहुदा २०१९ च्या लोकसभा-विधानसभा निवडणुकांसाठी हा मुद्दा राखून ठेवायचा आहे कि काय अशीही शंका आल्याशिवाय राहत नाही. कारण जिंकण्यासाठी सर्व काही असा भाजपचा सध्याचा मूड बघता या शंकेला भरपूरच वाव आहे. एक मात्र आहे, या प्रश्नावर सरकार बिथरलंय एवढ मात्र खरं! अन्यथा एरवी मुख्यमंत्री संयमित आणि रास्त भूमिका घेण्याबद्दल त्यांची ख्याती असताना 'कर्जमाफी केल्यावर शेतकरी आत्महत्या करणार नाहीत याची खात्री कोण देणार?' असा अप्रस्तुत व या प्रश्नाबद्दल असंवेदनशिलता सूचित करणारा तिरकस प्रश्न त्यांच्या तोंडून निघाला नसता.

कर्जमाफीचं राजकारण करताना प्रश्नाच्या मूळाशी जाऊन तो सोडवण्यासाठी करण्यासारखे काय-काय पर्याय आहेत यावर विचार-चर्चा करण्याचं भान मात्र कोणत्याही राजकीय पक्षाला राहिलेय असे दिसत नाहीये. फक्त सरकार विरुद्ध विरोधक असा सामना सुरु असल्याचे चित्र समोर दिसत आहे. हि खूपच क्लेशदायक आणि दुर्दैवी बाब आहे. यातून राजकीय इच्छाशक्तीचा अभाव हाच एक महत्वाचा मुद्दा समोर येत आहे. अन्यथा कोणत्याही समस्येचे निराकरण शास्त्रोक्त पद्धतीने करणे सहज शक्य असताना सर्वच राजकीय पक्षांकडून केवळ वाद-विवादांमध्ये जाणीवपूर्वक कालापव्यय केला जात आहे. थोडक्यात काय तर महाराष्ट्रभरात दिवसागणिक बळीराजा मरतोय जिवानिशी आणि मुंबईत विरोधक-सत्ताधारी करतायेत आपापली सरशी....असेच म्हणणे क्रमप्राप्त ठरते.

गेल्या वीस-पंचविस वर्षात काही निसर्ग-निर्मित आणि काही मनुष्य-व्यवस्था निर्मित अशा शेतकऱ्यांच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याचा एक अपरिहार्य परिणाम म्हणून या काळात पर्जन्यमान अनियमित-अनिश्चित आणि बेभरवशाचे होत गेले. त्यावर उपाय-योजना व्हायला हवी होती ती करणाऱ्यांनी केली नाही. मग वर्षादरवर्षागणिक शेतकऱ्यांची अवस्था खस्ता होत गेली. त्यातून बाहेर पडण्यासाठी उपयुक्त ठरण्याऐवजी आयात-निर्यात सारखी सरकारी धोरणे उलट त्यांच्या मुळावरच उठलीत. अशा प्रकारे शेतकरी चारही

बाजूने नाडला-नागवला गेला आणि मग सुरु झाली आत्महत्यांची सत्रे....त्यालाही आता बराच काळ लोटला गेलाय....जवळ-जवळ एक दशक...म्हणूनच मध्यंतरीच्या काळात तर सर्वच घटक शेतकरी आत्महत्यांना सरावले गेलेत आणि कोणी त्यांच्याकडे लक्षही देईनासे झाले....आता सुदैवाने सगळ्यांना जाग आली म्हणायचे तर या 'रस्सी-खेच'मूळे शेतकऱ्याच्या हातात मात्र काही पडताना दिसत नाहीये....आणि मग वाढताहेत फक्त आकड्यांवर आकडे...दिवसागणिक....प्रसंगी तासागणिक....

शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि शेतीविषयक प्रश्न हि समस्या गंभीर असली तरी प्रामाणिकपणे भिडण्याची सर्वांची तयारी असायला हवी....अगदी विरोधक, सरकार, प्रशासन, प्रसार माध्यमे, 'सकाळ', 'नाम' सारख्या संस्था, आमीर खानसारखी प्रकाश झोतातली मंडळी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे जवळ-जवळ बारा कोटींची सामान्य जनता....या सर्वांनी हातात हात घालून काम केलं तर काहीही अशक्य नाही...आणि मग बघा कशा आत्महत्या थांबत नाहीत ते !

(प्रस्तुत लेखकाने या प्रश्नावर उत्तरे शोधण्यासाठी काही उपक्रमांचे नियोजन केले असून महाराष्ट्रातील तमाम बारा कोटी बंधू आणि भगीनींनाही  या कार्यात सहभागी होण्यासाठी विनंती करीत आहे)

संपर्क:-

महेंद्र गौरीकुमार बैसाणे(भारुकाका)

ए-३०२, सनराईज गॅलक्सी, विजय सेल्सच्या पुढे, लुर्डस् हायस्कूल शेजारी, कल्याण-प.४२१३०१

मो./व्हाटस अप नं. ९३२१५५०२८६ ई मेल:-info@bharukaka.com

फेस बुक:-https://www.facebook.com/mahendra68(Mahendra G.Baisane)

ट्वीटर:-@MGBaisane